# जपानी पुष्परचना - भाग १४

इकेनोबो स्कूलच्या पारंपारिक रचना करताना काही नियमानुसार रचना केली जाते तर मुक्तरचना करताना मुक्त विचारातून रचना साकारली जाते.

यावेळची मुक्तरचना करताना कोणत्या विचारातून रचना सुचत गेली ते सांगते.




वरील रचनेत पांढरी फुले शांततेचे प्रतीक म्हणून लावली. त्याबरोबर गुलाबी जरबेरा आणि गुलाबी काड्या प्रेमाचे प्रतीक म्हणून वापरल्या. पिवळा जरबेरा हे मैत्रीचे प्रतीक!
इतर छोटी स्टॅटिसची फुले रंगसंगती चांगली साधण्यासाठी वापरली. हिरवी मनी प्लॅन्टची मोठी पाने व हिरवे अस्परॅगस हे पृथ्वीचे अस्तित्व दाखवत आहेत. जणू काही ही सर्व फुले शांती, प्रीती आणि मैत्री ची देवाण घेवाण करत गुण्यागोविंदाने नांदत, पृथ्वीवरचे आपले आनंदी अस्तित्व दाखवत आहेत. मनुष्यजातीसाठी महत्वाचा संदेश देत आहेत.

सौ. अरुंधती देशपांडे
व्हाईस प्रेसिडेंट, इकेनोबो इकेबाना पुणे शाखा.
ई-मेल... asdssd@gmail.com